अन्यायाचा प्रतिकार करणारे एकमेव वृत्तपत्र

# रायगड पनवेल

संपादक : संतोष तुकाराम भगत ८४५१८८२१०० ९१६७०१४७८१ उपसंपादक : विलास मधुकर मोरे

समाजातील कुठलाही प्रश्न असो, समस्या असो, फसवणूक झाली असेल, जास्त रक्कमेची मागणी होत असेल, जमीन प्रकरण असो किंवा सिडको महानगरपालिका, नगरपरिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायतमधील प्रश्न असो ! या सर्वांच्या न्याय हक्कासाठी धावून येईल साप्ताहिक रायगड पनवेल ....! चला तर मग.... दाद मागण्यासाठी फोन करुया रायगड पनवेलला न्याय मिळून देईल आपल्याला !

• वर्षः ६ वे • अंक ४६ • रायगड • गुरूवार, दि. ०८ ते १४ ऑक्टोबर २०२० RNI No. MAHMAR/2014/59654 • किंमत:२ रू.• पाने ४

# मोक्याच्या जागेवर अनधिकृत होर्डिंग्ज

## मंत्र्यांच्या आदेशालाही केराची टोपली; महापालिकेची कारवाई करण्यास टाळाटाळ

**पनवेल/प्रतिनिधी**

अगदी सिनेमामध्ये असलेला प्रकार सध्या पनवेल महानगरपालिका हद्दित सुरु आहे. सिनेमामध्ये काही गुंड एखाद्या जागेवर कब्जा करतात आणि मग ते तिथून हलतच नाहीत. जागा मालक आपल्या जागेवरील अतिक्रमण हटविण्यासाठी कायदेशीर प्रयत्न करतो मात्र त्याला प्रशासनाकडून योग्य ते सहकार्य मिळत नसल्याने त्याचे सर्व प्रयत्न वाया जातात. असाच काहीसा प्रकार कळंबोली येथे मोक्याच्या ठिकाणी जागा असलेल्या विजय वसंत अंगणे यांच्या बाबतीत सुरु आहे.



महापालिका प्रशासनाने सुध्दा ही होर्डिंग्ज अनधिकृत असल्याचा निर्वाळा देवून दोन वर्ष उलटली तरी ही होर्डिंग्ज या ठिकाणी दिमाखात उभी आहेत. ही होर्डिंग्ज अगदी मोक्याच्या ठिकाणी असल्यामुळे या होर्डिंग्जच्या माध्यमातून लाखो रुपयांची कमाई देखील संबंधित करीत आहेत. वसंत अंगणे यांची कळंबोली येथे असलेल्या मॅकडोनाल्ड या हॉटेलशेजारी जागा आहे. ही जागा मुंबई पुणे महामार्गालगतच असल्याने या ठिकाणी होर्डिंग्ज म्हणजे लाखो लोकांपर्यंत पोहचण्याचा मार्ग आणि म्हणूनच या ठिकाणी होर्डिंग्ज लावण्याकरीता अधिक पैसे मोजायला काही कंपन्या मागे पुढे पाहत नाहीत. याचाच फायदा ही अनधिकृत होर्डिंग्ज उभे करणारे घेत आहेत. होर्डिंग्जमधून महापालिकेला कमाई होते. महापालिकेची परवानगी घेवूनच होर्डिंग्ज लावली जातात आणि त्यासाठी महानगरपालिकाही शुल्क आकारते. मात्र या होर्डिंग्जमधून महापालिकेला एक रुपयाचेही उत्पन्न मिळत नसताना ही या होर्डिंग्जवर कारवाई का केली जात नाही असा प्रश्न उपस्थित होत आहे. अगदी राज्याचे मंत्री एकनाथ शिंदे यांनी सुध्दा २८/०१/२०१९ रोजी पत्राव्दारे सेक्टर १ ई कळंबोली येथील अनधिकृत होर्डिंग्ज हटविण्याचे आदेश दिले होते. मात्र या आदेशांनाही केराची टोपली दाखविण्यात आली आहे. याबाबत माहितीच्या अधिकाराखाली अंगणे यांनी माहिती मागितली असता त्यांना सिडकोकडून सदर आदेशाची नोंद घेवून कारवाईसाठी संबंधित विभागांना कळविण्यात आले आहे असे लेखी उत्तर १०/०५/२०१९ रोजी देण्यात आले होते. मात्र आजपर्यंत ही कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे संबंधित विभाग झोपला आहे का? असा प्रश्न पडल्यास आश्चर्य वाटू नये.

सदर अनधिकृत होर्डिंग्ज हटविण्यासाठी मुन्ना भगत, दिलीप खानावकर, माया भगत यांना ३१/१०/२०१८ रोजी एका पत्राव्दारे कळविण्यात आले होते. या पत्रात स्पष्टपणे लिहिले आहे की, कळंबोली सेक्टर १ ई, मॅकडोनाल्ड, पेट्रोलपंप पासून पुढे कळंबोली सर्कलपर्यंत अनधिकृत होर्डिंग्ज उभारण्यात आली आहेत. याकरीता महानगरपालिकेची कोणतीही परवानगी घेण्यात आलेली नाही तरी ही होर्डिंग्ज सात दिवसात काढून टाकावीत. अन्यथा महानगरपालिका अधिनियम कलम २४४, २४५ नुसार एआरटीपी ॲक्ट नुसार महापालिका ही होर्डिंग्ज काढण्याची कारवाई करेल व सदरचा खर्च हा आपणाकडून वसूल करण्यात येईल असे नमूद केले आहे. मात्र अजूनही महापालिकेचे सात दिवस झालेले नाहीत. यापैकी मुन्ना भगत यांना सदर अनधिकृत होर्डिंग्ज काढण्याकरीता नोटीस बजावण्यात आली होती. मात्र ही होर्डिंग्ज आपली नसल्याचे कारण देत त्यांनी ही नोटीस स्विकारण्यास नकार दिला.

सदरची अनधिकृत होर्डिंग्जही कुणाच्या आशिर्वादाने अनेक वर्ष दिमाखात उभी आहेत असा सवाल उपस्थित होत आहे.

### एकनाथ शिंदे यांच्या आदेशाला केराची टोपली

नगरविकास व सार्वजनिक बांधकाम मंत्री एकनाथ शिंदे यांनी दि. ४/१२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये सदरची चार अनधिकृत बांधकामे काढण्याचे आदेश दिले होते. मात्र त्यांच्या आदेशाचीही अंमलबजावणी करण्यात आलेली नाही.

### महानगरपालिकेची सिडकोकडे विचारणा व कारवाई करण्याची विनंती

पनवेल महानगरपालिकेने दि. ३१/१०/२०१८ रोजी सदरची होर्डिंग्ज अनधिकृत ठरवून ती हटविण्याबाबतची नोटीस मुन्ना भगत, दिलीप खानावकर, माया भगत यांना दिली होती. मात्र १७/१२/२०१८ रोजी सिडकोकडे महापालिकेने सदरच्या होर्डिंग्जना आपण परवानगी दिली आहे का अशी विचारणा करुन केवळ पत्रव्यवहारामध्ये वेळ घालविण्याचे काम केले आहे. त्यामुळे महानगरपालिकेचे या अनधिकृत होर्डिंग्जना छुपा पाठींबा आहे की काय असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### अतिक्रमणे हटविण्यासाठी अंगणे यांची एकाकी झुंज

अगदी मोक्याच्या ठिकाणी आपली असलेल्या जागेवरील अतिक्रमणे हटविण्यासाठी विजय अंगणे हे ७० वर्षीय वृध्द गृहस्थ एकाही झुंज देत आहेत. मात्र सिडको आणि महापालिकेकडून त्यांना योग्य सहकार्य मिळत नसल्याची खंत त्यांनी बोलून दाखवली.

# श्रीमंत ग्रामपंचायतीचा रस्ता भिकार

## आदई गावातील रस्त्याची दयनिय अवस्था

**नवीन पनवेल/मनोहर पाटील**

नवीन पनवेलपासून काही अंतरावरच असणाऱ्या आदई गावाचा विकास झपाटयाने होत आहे. या ग्रामपंचायत हद्दित मोठ मोठे गृहप्रकल्प उभे राहत आहेत. त्यामुळे या ग्रामपंचायतीच्या उत्पन्नामध्ये कमालीची वाढ झाली आहे. मात्र असे असताना आदई गावात प्रवेश करताच येथील रस्त्याची झालेली दयनीय अवस्था लक्षात येते. त्यामुळे श्रीमंत ग्रामपंचायत असूनही रस्त्यावर खर्च करण्यात येत नसल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

गावात अनेक मोठमोठे गृहप्रकल्प झाले आहेत. या ठिकाणी जाणाऱ्या रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करण्यात आले आहे. मात्र गावात जाणारा रस्ता आजही खड्डयात आहे. त्यामुळे श्रीमंतांना एक न्याय आणि ग्रामस्थांना एक न्याय अशी चर्चा सध्या सुरु आहे. सदर ठिकाणी मोठ मोठी बांधकामे सुरु असल्याने या बांधकाम व्यवसायिकांतर्फे अवजड वाहतूक या रस्त्यावरुन होत असते. बांधकाम व्यवसायिकांना एनओसी देताना आर्थिक हितसंबंध जपले जात असल्याने या बांधकाम व्यवसायिकांच्या सुरु असलेल्या अवजड वाहतूकीबाबत कोणीच काही बोलत नाही. पनवेलपासून अगदी जवळ असल्याने नागरिक या ठिकाणी घर घेण्यास पसंती देतात आणि त्यामुळेच आदई गावाची लोकसंख्याही झपाटयाने वाढत असताना ग्रामपंचायत त्यांना नागरी सोयी सुविधा पुरविण्यास कमी पडत असल्याचे चित्र आहे.



# गुटखा विक्री करणाऱ्यांविरुद्ध कामोठे पोलिसांनी केली कारवाई

**पनवेल/प्रतिनिधी**

पनवेल महानगर पालिका हद्दीत कोरोना विषाणू साथीचा आजार कोविड १९ दिवसेंदिवस फैलावत चालला असून रुग्णांच्या संख्येत देखील वाढ होत आहे. पनवेल महानगर पालिका व संबंधित पोलीस ठाणे यांच्यामार्फत नियम मोडणाऱ्या दुकानांवर व व्यक्तींवर दंडात्मक कारवाई करीत आहेत. मात्र नुकतेच कामोठे येथे कामोठे पोलीस ठाण्याच्या समोरील बाजूच्या रस्त्यावर मेघना वाईन्ससमोर ह्युंदाई इऑन या चारचाकीमध्ये संपूर्ण गाडी भरून गुटखा, तंबाखू या पदार्थांची विक्री होत असल्याची माहिती क्रांतीज्योत महिला फाउंडेशनच्या अध्यक्षा व पत्रकार रुपालीताई शिंदे यांना कामोठे येथे राहणाऱ्या महिलांनी दिली त्यानुसार रुपालीताई शिंदे यांनी याठिकाणी जाऊन पाहणी केला असता याठिकाणी दोन इसम खुलेआम गुटखाविक्री करीत असल्याचे आढळून आल्यानंतर तात्काळ रुपाली शिंदे यांनी याची व्हिडीओ शूटिंग पत्रकारांकडून करून घेऊन कामोठे पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांना भेटून याप्रकरणाची माहिती दिली व सत्यता दाखवली.

यावेळी कामोठे पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांनी दखल घेऊन सदर गुटखाविक्री करणाऱ्यावर कारवाई करण्याचे आदेश त्यांनी पोलीस अधिकाऱ्यांनी दिले. त्यानुसार क्रांतिज्योत महिला विकास फॉउंडेशन च्या मार्फत देण्यात आलेल्या तक्रारी अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे हुंडाई युवान गाडी क्रमांक एमएच ६४५० ८६ या चार चाकी गाडीत खुलेआम गुटखा विक्री करणार्या इसमावर कामोठे पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर ३६ २०२० भादवि कलम १८८ २७० २७१ सह राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन कायम सन २००५ चे कलम ५१ कलम तीन प्रमाणे गुन्हा गुन्हा नोंद करण्यात आला असून सदर गुन्हा मध्ये ह्यामध्ये एम एच ४६ही गाडी जप्त करण्यात आली आहे सबब तक्रारी अर्ज दप्तरी फाईल करण्यात आला आहे.असे पत्र कोमोठे पोलीस स्टेशन मधून मिळाले. आपण आमच्या तक्रारी अर्जावर केलेल्या तात्काळ कारवाई मुळे आपले खूप खूप धन्यवाद.आपण असेच सहकार्य करावे.

# पनवेल प्रेस क्लबचे संस्थापक विजय कडू यांचा वाढदिवस साजरा



**पनवेल/प्रतिनिधी**

०७ ऑक्टोबर रोजी पनवेल प्रेस क्लब चे संस्थापक तथा दैनिक वादळवारा चे संपादक श्री विजय दामोदर कडू (अप्पा) यांचा वाढदिवस पनवेल च्या पत्रकार मित्रांनी त्यांच्या सोबत केक कापून साजरा केला. गेल्या सत्तावीस वर्ष पत्रकारितेत वादळवार सारख्या दैनिक चालत त्यांनी समाज्यातील प्रश्न मांडून सर्व घटकाला न्याय देण्याचे मोलाचे काम करत असताना पनवेल प्रेस क्लबची स्थापना **(पान ३ वर)**

# अनेक गुन्हयात हवा असलेला आरोपी गजाआड

## पोलीस उपनिरिक्षक रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली खांदेश्वर पोलिसांची कामगिरी

**पनवेल/प्रतिनिधी**

खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दित एक अज्ञात इसम महानगर गॅस निगमचा कर्मचारी असल्याचा बहाणा करुन घरात घुसला व घरात उपस्थित असलेल्या महिलेला काही कळायच्या आत टेबलावरील मंगळसूत्र घेवून फरार झाला. सदर महिलेने तक्रार करताच अज्ञाताविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, खांदा कॉलनी येथील ओम श्रीकृष्ण अपार्टमेंट, रुम नं. ए २, से. ०७, खांदा कॉलनी ता. पनवेल यांचे घरी अज्ञात इसम येवुन त्याने महानगर गॅस निगम चा कर्मचारी आहे या बहाण्याने प्रवेश केला. फिर्यादी यांचे हॉलमधील टी.व्ही. टेबलवर ठेवलेले १५ ग्रॅम वजनाचे मंगळसुत्र चोरी करुन घेवुन त्याने पलायन केले. याबाबत खांदेश्वर पोलीस ठाणे येथे गु.रजी.क्र.१७/२०२० भा.दं.वि. कलम ३८० प्रमाणे नोंद करण्यात आला होता.



खांदेश्वर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पो.उप.निरी. रोंगे यांचे पथकाने सी.सी.टी.व्ही. फुटेज व तांत्रिक तपास करुन सदर गुन्ह्यातील आरोपी प्रमोद कृष्णा मयेकर (वय ४७ वर्षे, धंदा- बेकार, रा. बरकतअली दर्गा झोपडपट्टी, वडाळा, मुंबई ) येथुन ताब्यात घेवुन त्यास दि. ३०/०९/२०२० रोजी अटक केली. त्याला अटक करुन अधिक तपास केला असता अनेक गुन्हे उघडकीस आले.

यामध्ये खांदेश्वर पोलीस ठाणे, नवी मुंबई गु.रजी. क्र. १७/२०२० भा.दं.वि. कलम ३८०, भोईवाडा पोलीस ठाणे, मुंबई गु.रजी. क्र. ३३०/२०१९ भा.दं.वि. कलम ३८०, भोईवाडा पोलीस ठाणे, मुंबई गु.रजी.क्र. ३३८/२०१९ भा.दं.वि. कलम ३८०. या गुन्ह्यातील गेला माल ३३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले आहेत तसेच सदर आरोपिने शिवाजी पार्क पोलीस ठाणे, दादर पोलीस ठाणेचे हद्दीमध्ये चोरी केलेला १ आय फोन मोबाईल व ०१ सॅमसंग मोबाईल देखील जप्त करण्यात आलेला आहे.

सदर आरोपी गुन्हा करताना एकच पध्दत वापरत होता. महानगर गॅस निगम चा कर्मचारी आहे असे सांगुन घरात प्रवेश करणे व फिर्यादींना कागदपत्रांची मागणी करुन ते कागदपत्रे शोधण्यासाठी जाताच मौल्यवान वस्तुंची चोरी करुन तो पळून जायचा. अशा प्रकारे त्याने अनेक गुन्हे केले असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

## संपादकीय

# बळीराजा संभ्रमात

केंद्र सरकारने लागू केलेल्या शेती सुधारणा कायद्यांना गेले काही दिवस विविध राज्यांमध्ये विरोध सुरू आहे. देशाचे धान्याचे कोठार अशी ओळख असलेल्या पंजाबमध्ये होत असलेले आंदोलन अधिक तीव्र आहे. संसदेत ही विधेयके आल्यापासूनच तेथील शेतकऱ्यांकडून विरोध होतो आहे. राज्यातील सत्ताधारी काँग्रेसनेही मैदानात उडी घेत केंद्रातील भाजप सरकारच्या विरोधात रणशिंग फुंकले. हरियाणा, उत्तर प्रदेश, कर्नाटकमध्ये आणि काही प्रमाणात महाराष्ट्र, मध्य प्रदेशातही शेती कायद्यांच्या निषेधार्थ आंदोलने होत आहेत. या तीन कायद्यांमुळे शेतकऱ्यांची कशी हानी होऊ शकते आणि त्यातून अंबानी-अदानींसारख्या उद्योगपतींचे भरणपोषण कसे होईल, याचे ढोबळ चित्र काँग्रेसने उभे केले आहे. या काँग्रेसप्रणीत आंदोलनाचा रोख बघून केंद्र सरकार व त्यांचे मंत्रीही या कायद्यांच्या समर्थनार्थ ढोबळ मुद्दे मांडत आहेत. त्यातून हे कायदे किती हानिकारक वा कितपत फायद्याचे, हे सामान्य शेतकऱ्यांनाही समजेनासे झाले आहे. पण, यातून काँग्रेसजनांना मात्र काहीसा दिलासा मिळाला आहे. शेती सुधारणा कायदाविरोधी आंदोलने व याचदरम्यान घडलेल्या हाथरस घटनेच्या निमित्ताने काँग्रेस एकदम आक्रमक झाल्याचे दिसते आहे. रविवारी पंजाबमधील मोगा येथे झालेल्या ट्रॅक्टर रॅलीत तर राहुल गांधी यांनी, आपले सरकार केंद्राच्या सत्तेत आल्यावर हे काळे कायदे रद्द करेल, असे सांगितले. हा तोच काँग्रेस पक्ष आहे, जो काही दिवसांपूर्वीपर्यंत भाजप व मोदी सरकारच्या दांडगाईपुढे अक्षरशः हतबल झाला होता. भाजपला तोंड देण्यास पक्ष कमी पडत असल्याचे सांगत अनेक ज्येष्ठ नेत्यांनी हायकमांडनाच पत्र लिहिले होते. त्यानंतर पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीत प्रदीर्घ चर्चा होऊन सोनिया गांधींकडेच प्रभारी अध्यक्षपद देण्यात आले. त्यानंतर हा पक्ष हळूहळू कात टाकताना दिसतो आहे. भाजपच्या आक्रमणापुढे आपण टिकणारही नाही, अशा न्यूनगंडाने ग्रासलेल्या या पक्षाने, सत्तेवर पुन्हा येताच कायदे रद्द करू' म्हणणे ही गोष्ट गमावलेला आत्मविश्वास परत येत असल्याचे द्योतक आहेच, शिवाय ती एखाद्या क्रांतीपेक्षा कमीही नाही. देशातील लोकशाही टिकण्यासाठी या घडीला अशा क्रांतीचा किमान उद्गार होणे महत्त्वाचे आहे.

# रेस्टॉरंटस् आणि बार सुरु करण्याबाबत एसओपी जाहीर

**मुंबई/प्रतिनिधी**

राज्यातील कंटेनमेंट झोन वगळता इतर क्षेत्रातील रेस्टॉरंटस् आणि बारसुरु करण्याबाबत पर्यटन संचालनालयामार्फत आज आदर्श कार्यप्रणाली (एसओपी) जारीकरण्यात आली. मिशन बिगीन अगेनअंतर्गत येत्या ५ ऑक्टोबरपासून ५० टक्केपेक्षा जास्त नाहीइतक्या क्षमतेने हॉटेल्स, फूड कोर्टस्, रेस्टॉरंटस् आणि बार सुरु करण्यास संमती देण्यात आली आहे.



पर्यटन विभागाच्या प्रधान सचिव श्रीमती वल्सा नायर - सिंह यांनी आदरातिथ्य क्षेत्रातील विविध रेस्टॉरंटस् आणि हॉटेल संघटनांना पत्राद्वारे एसओपीची माहिती दिली आहे. कोरोनाचासंसर्ग रोखण्याच्या अनुषंगाने एसओपीमध्ये देण्यात आलेल्या मार्गदर्शक सुचनांचे रेस्टॉरंटस् (कॅफे, कँटीन, डायनिंग हॉल, परवानाधारक फूड अँड बेव्हरेजेस (एफ अँड बी) युनिटस्/आऊटलेटस्, हॉटेल/रिसॉर्ट/क्लब यांचा अंतर्गत किंवा बाह्य भाग यांसह) आणि बार यांनी तंतोतंत पालन करावे, असेआवाहन त्यांनी केले आहे.

एसओपीमध्ये पुढील प्रमाणे सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत.

कोरोनाच्या लक्षणासंदर्भात सर्व ग्राहकांची प्रवेशद्वारापाशी थर्मल गनसारख्याउपकरणाद्वारे तपासणी करण्यात यावी. लक्षणे नसलेल्या ग्राहकांनाच प्रवेश देण्यात यावा. सेवा देताना किंवा प्रतिक्षा करताना सोशल डिस्टन्सिंगचे पालन करण्यात यावे. ग्राहकांनी मास्कपरिधान केलेला असेल तरच त्यांना प्रवेश देण्यात यावा. खानपानाशिवाय इतर वेळी ग्राहकांनीमास्क परिधान करणे आवश्यक आहे. आवश्यकतेनुसार ग्राहकांची माहिती आरोग्य विभाग किंवाप्रशासनास देण्याबाबत त्यांची नाहरकत घेण्यात यावी. संबंधीत आस्थापना चालकांनीग्राहकांसाठी हँड सॅनिटायजर उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. परिसरातील महत्वाच्या ठिकाणीते उपलब्ध करण्यात यावेत. डिजीटल माध्यमाद्वारे चलन देण्यास प्रोत्साहन द्यावे. रोखचलनव्यवहार असल्यास चलनाची हाताळणी काळजीपूर्वक करावी. रेस्टरुम आणि हातधुण्याच्या जागांची (वॉशरुम) वेळोवेळी स्वच्छता (सॅनिटाईज) करण्यात यावी. काऊंटरवर कॅशिअर आणि ग्राहकांमध्ये शक्यतो प्लेक्सिग्लास स्क्रीन असावे. शक्य असल्यास प्रवेशासाठी आणि बाहेरजाण्यासाठी वेगवेगळे मार्ग ठेवावेत. शक्य असल्यास दारे - खिडक्या खुल्या ठेवून शुद्ध हवा आतयेऊ द्यावी, एसीचा वापर टाळावा. एसी वापरणे अनिवार्य असल्यास त्या यंत्रणेचे वेळोवेळीनिर्जंतुकीकरण करण्यात यावे. सीसीटीव्ही यंत्रणा कार्यरत असाव्या. क्युआर कोडसारख्यामाध्यमातून संपर्करहीत मेनुकार्ड उपलब्ध करावे. कापडाच्या नॅपकिनऐवजी चांगल्या दर्जाच्याविघटनशील पेपर नॅपकिनचा वापर करावा. टेबलांच्यामध्ये किमान १ मीटर अंतर राहील याप्रमाणेरेस्टॉरंट, बार यांच्या रचनेमध्ये आवश्यक बदल करण्यात यावा. ग्राहकाच्या मागणीनुसारबाह्यबाजू निर्जंतुक केलेली पाण्याची बाटली किंवा फिल्टर केलेले पाणी उपलब्ध करावे. मेनुमध्ये शक्यतो शिजवलेल्या पदार्थांचा समावेश असावा. शक्य असल्यास सलाडसारखे कच्चे पदार्थ, थंडपदार्थ टाळावेत. प्रत्येक ग्राहकाच्या वापरानंतर त्या जागेचे निर्जंतुकीकरण करण्यात यावे. टेबल,खुर्च्या, काऊंटर आदी जागांचे वेळोवेळी निर्जंतुकीकरण करण्यात यावे. बुफे सेवेला परवानगी नसेल. जिथे शक्य असेल तिथे मेनुमध्ये प्री - प्लेटेड डिशेसना प्रोत्साहन देण्यात यावे. प्लेटस्, चमचे आदी सर्व भांडी गरम पाण्यात आणि संमत असलेल्या मान्यताप्राप्त डिसइन्फेक्टंटनी (जंतुनाशक) धुवावीत. सेवा देण्याच्या वस्तु,भांडी ही वेगवेगळी आणि सॅनिटाईज केलेल्या कपबोर्डमध्ये ठेवावीत. भांडी आणि अन्नपदार्थ गरम ठेवण्यासाठी वेगवेगळे वॉर्मर्स वापरावेत. ग्राहकांनी वापरलेली भांडी एका बाजुला जमा न करता तीतातडीने धुण्यासाठी न्यावीत. कॉन्टॅक्ट ट्रेसिंगच्या अनुषंगाने ग्राहकाचे नाव, संपर्क क्रमांक, ईमेलआदी माहिती घेण्यात यावी. करमणुकीच्या लाईव्ह कार्यक्रमास मनाई असेल. तसेच बिलीयर्डस,डार्टस्, व्हीडीओ गेम्स आदी गेम क्षेत्रास मनाई असेल. इनडोअर आणि आऊटडोअर कार्ड रुमलामनाई असेल. सर्व आस्थापनांनी त्यांच्या सर्व कर्मचाऱ्यांची नियमीत कोव्हीड चाचणी करणेअत्यावश्यक आहे. एन ९५ किंवा याच दर्जाचा मास्क कर्मचारी वापरतील याची खात्री करावी.परिसराचे निर्जंतुकीकरण करण्यासाठी दिवसातून दोनवेळा परिसर सॅनिटाईज करावा.सीसीटीव्ही रेकॉर्ड जतन करण्यात यावे.

ग्राहकांनी गर्दी टाळण्यासाठी शक्यतो जागेचे पूर्व आरक्षण करावे. आस्थापना चालकांनीसेवा देताना कोरोना रोखण्यासाठी घ्यावयाच्या दक्षतांबाबत तसेच वैयक्तिक स्वच्छता, सोशलडिस्टन्सिंग आदीबाबत कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण घ्यावे. याशिवाय ग्राहकांनी रेस्टॉरंटमध्येयेण्यापुर्वी आणि आल्यानंतर घ्यावयाच्या दक्षता, अन्न आणि पेयपदार्थ तयार करणे आणि त्याची सेवा देताना घ्यावयाच्या दक्षता, कोरोनाचा संसर्ग रोखण्यासाठी कर्मचाऱ्यांना द्यावयाचेमार्गदर्शन आणि प्रशिक्षण, ग्राहकांना सेवा देताना घ्यावयाची दक्षता, बारमध्ये घ्यावयाच्या दक्षता, किचनमध्ये घ्यावयाच्या दक्षता, सुक्या आणि ओल्या कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन, स्टाफ एरिया संदर्भातील मार्गदर्शक तत्वे, कर्मचाऱ्यांची वाहतूक, कर्मचाऱ्यांच्या गणवेशासंदर्भातीलमार्गदर्शक तत्वे, कर्मचाऱ्यांची खानपान सुविधा, एखाद्या कर्मचाऱ्यामध्ये कोरोना लक्षणेआढळल्यास किंवा कोरोनाबाधीत आढळल्यास तातडीने करावयाची कार्यवाही अशा विविधमुद्द्यांसंदर्भातील मार्गदर्शक सुचनांचा समावेश एसओपीमध्ये करण्यात आला आहे.

आस्थापनांसमवेत झालेल्या चर्चा, केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय,डब्ल्यूएचओ, युएनडब्ल्यूटीओ, केंद्रीय पर्यटन मंत्रालय यांनी जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनातसेच एफएसएसएआय यांनी कोरोनाकाळात अन्नसुरक्षेबाबत जारी केलेल्या मार्गदर्शकसूचनांच्या आधारे ही एसओपी तयार करण्यात आली आहे.

# हे टाळा, कोरोनाचा धोका टळेल

सध्या सगळीकडे कोरोनाने उच्छाद मांडला आहे. कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव वाढतच चालला आहे. देशात दररोज नवीन प्रकरणे येत आहे. कोरोनापासून सुरक्षित राहण्यासाठी खाण्यापिण्याची विशेष काळजी घेणं आवश्यक आहे. कोरोना व्हायरसपासून सुरक्षित राहण्यासाठी आपली रोग प्रतिकारक शक्ती बळकट ठेवणं खूप महत्त्वाचं आहे. रोग प्रतिकारक शक्ती बळकट असल्यामुळे कोरोनाच्या संसर्गाचा धोका कमी होऊ शकतं. आज या लेखाच्या माध्यमातून आम्ही आपल्याला सांगत आहोत की आपल्याला कोरोनापासून वाचण्यासाठी कोण कोणत्या गोष्टी टाळण्याची गरज आहे. या गोष्टींचा अधिक सेवन केल्यानं आपली रोग प्रतिकारक शक्ती कमकुवत होते. चला तर मग जाणून घ्या की कोरोनापासून सुरक्षित राहण्यासाठी कोणत्या गोष्टी टाळल्या पाहिजे.

**जास्त प्रमाणात मीठ खाऊ नये -**

मिठाचं जास्त सेवन केल्यामुळे आपली रोग प्रतिकारक शक्ती कमकुवत होऊ लागते. कोरोना पासून सुरक्षित राहण्यासाठी जास्त प्रमाणात मीठ खाणं टाळावं. आपल्या रोग प्रतिकारक शक्तीला बळकट करण्यासाठी कमी प्रमाणात मीठ खावं.

**चहा आणि कॉफीचे जास्त सेवन करणं टाळावं -**

चहा आणि कॉफी जास्त प्रमाणात घेतल्यानं आपली रोग प्रतिकारक शक्ती कमकुवत होऊ शकते. चहा आणि कॉफीत कॅफिन जास्त प्रमाणात आढळतं आणि मोठ्या प्रमाणात कॅफीनचा सेवन केल्यानं आपल्या आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होतो.

**एनर्जी ड्रिंक्स -**

एनर्जी ड्रिंक्सचे सेवन केल्यानं आपली रोग प्रतिकारक शक्ती कमकुवत होऊ लागते. कोरोना काळात एनर्जी ड्रिंक्सच्या वापर करणं टाळावं. एनर्जी ड्रिंक्सच्या सेवनानं आरोग्यावर प्रतिकूल प्रभाव पडतो.

**गोड वस्तू खाणं टाळावं -**

जास्त प्रमाणात गोड खाणं टाळावं. जास्त गोड खाल्ल्यानं आपली रोग प्रतिकारक शक्ती कमकुवत होऊ लागते. गोड गोष्टींचा सेवन मर्यादितच करावं. जास्त प्रमाणात गोड खाल्ल्यानं आरोग्यावर विपरीत परिणाम होण्यास सुरुवात होते.

**✻ मद्यपान करणं टाळा -**

मद्यपानाचे सेवन केल्यानं आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होतो. मद्यपान केल्यामुळे रोग प्रतिकारक शक्ती कमकुवत होते. निरोगी आणि तंदुरुस्त राहण्यासाठी मद्यपान करणं टाळावं.

✻ हा लेख निव्वळ आपल्या माहितीसाठी आहे, आपल्याला काही आजार असल्यास आपल्या डॉक्टरांचा सल्ला जरूर घ्यावा.

# घरीच तयार करा फेस प्रायमर, सोपी पद्धत जाणून घ्या

जेव्हा जेव्हा मेकअप बद्दल बोललं जातं तर सर्वात आधी नाव येतं प्रायमरच, कारण प्रायमर आपल्या त्वचेवर मेकअपला सेट करण्यासाठी मदत करतं. कोणतेही मेकअप उत्पादन वापरण्यापूर्वी प्रायमर लावण्याचा सल्ला दिला जातो, कारण मेकअपमध्ये प्रायमरची जागा खूप महत्त्वाची असते.

प्रायमरच्या मदतीने मेकअप बेसला गुळगुळीत करू शकतो, त्याचा बरोबर दीर्घकाळ मेकअप टिकून राहण्यासाठी प्रायमर आवश्यक आहे.

परंतु जर आपल्याला बाजारपेठांतील प्रायमर सूट होतं नसल्यास आणि आपल्या त्वचेला या पासून काही त्रास होतं असल्यास आपण बाजारपेठेतून आणण्यापेक्षा घरात तयार केलेले प्रायमर वापरू शकता.



आता आपल्या मनात हा प्रश्न उद्भवत असणार की आपण घरात कसं काय प्रायमर तयार करू शकता. तर यांची काळजी आपण अजिबात करू नये. आम्ही आपल्यासाठी खास घेऊन आलो आहोत घरात प्रायमर बनविण्याचा काही खास टिप्स या लेखात आपण जाणून घेऊया की घरात आपण प्रायमर कसं काय तयार करू शकतो. तर चला मग नैसर्गिक प्रायमर बद्दल जाणून घेऊया.

कोरफड एक नैसर्गिक प्रायमरचे काम करतं. आपण कोरफडीची जेल मेकअप करण्याचा पूर्वी आपल्या संपूर्ण चेहऱ्यावर लावावी. या नंतर मेकअप सुरू करा. आपणास तर हे माहितीच आहे की कोरफड जेल त्वचेसाठी किती फायदेशीर आहे. हे आपल्या त्वचेला निरोगी ठेवण्यास मदत करते.

कोरफड जेल आणि आपल्या मॉइश्चरायझरला समप्रमाणात मिसळून आपल्या संपूर्ण चेहऱ्यावर मेकअप करण्यापूर्वी लावून घ्या. हे देखील एक उत्तम प्रायमर आहे. कोरफड जेल आणि बदामाच्या तेलाचे काही थेंब आणि थोडं फाउंडेशन या तिन्हींना चांगल्या प्रकारे मिसळून घ्या आणि घट्ट पेस्ट बनवा. तयार आहे आपले घरगुती प्रायमर.

# साप्ताहिक राशीभविष्य

**गुरुवार दि. ८/१०/२०२० ते बुधवार दि. १४/१०/२०२०**

**मेष** : न्यायसंबंधी विषयांमध्ये यश मिळेल. महत्वपूर्ण कार्यांमध्ये यश मिळेल. आरोग्य उत्तम राहील. व्यापार-व्यवसाय सुरळीत राहील. मान-सन्मानात वाढ होईल. संवादांची अदला-बदल आणि आपल्या आवडी-निवडींप्रमाणे कार्य करण्यासाठी आजचा दिवस सर्वात उत्तम आहे. आजचा दिवस जोमदार ठरेल. आपला विधायक दृष्टीकोण इतरांबरोबर समन्वय साधण्यात मदत करतो. आपल्या क्रोधावर संयम ठेवा आणि सहकाऱ्यांबरोबर वादाची स्थिती टाळा.

**वृषभ** : कार्यात यश मिळविण्यासाठी आपले मत ठामपणे मांडा. इतर लोकांबरोबर काही विषयांवर संमती द्यावी लागू शकते. कौटुंबिक मुद्द्यांचे समाधान मिळेल. जर आपली इच्छा असेल तर दिवसा पाहिलेली आपली स्वप्ने खरी ठरू शकतात. मानसिक सुख-शांतिचे वातावरण राहील. नोकरीपेशा व्यक्तींना कामात अनुकूल वातावरण मिळेल. मित्रांचा पाठिंबा मिळेल. पत्नी प्रसन्नतेचे कारण बनेल.

**मिथुन** : जर आपणास एखाद्या योजनेसाठी सहकार्य पाहीजे असेल तर असे सांगण्यास मागे-पुढे पाहू नका. आपल्या आवश्यकतेप्रमाणे इतर आपल्या मदतीला येतील. इतर योजना आणि उपक्रम सामान्यपणे चालू द्या. गुप्त संबंधांकडून व्यापारसंबंधी चांगला सल्ला मिळू शकते. निश्चितच आर्थिक योजनेमध्ये उन्नती होईल. जेव्हा आपणास गरज असेल तेव्हा आपणास आपल्या कुटुंबियांचा सहयोग मिळेल.

**कर्क** : जर आपणास एखाद्या योजनेसाठी सहकार्य पाहीजे असेल तर असे सांगण्यास मागे-पुढे पाहू नका. आपल्या आवश्यकतेप्रमाणे इतर आपल्या मदतीला येतील. इतर योजना आणि उपक्रम सामान्यपणे चालू द्या. गुप्त संबंधांकडून व्यापारसंबंधी चांगला सल्ला मिळू शकते. निश्चितच आर्थिक योजनेमध्ये उन्नती होईल. जेव्हा आपणास गरज असेल तेव्हा आपणास आपल्या कुटुंबियांचा सहयोग मिळेल.

**सिंहः** लेखन संबंधी विषयांमध्ये अनुकूल परिस्थिती राहील. आरोग्य उत्तम राहील. महत्वाच्या कामांमध्ये यश मिळेल. एखाद्या सहकर्मी व्यक्तीची असामाजिक वागणूक आपल्या नोकरीत विघ्न घालेल. कार्यकुशल आणि विनम्र रहाण्याचा प्रयत्न करा. पूर्वी केलेल्या श्रमाच्या फळाचा आनंद घेण्याची वेळ आहे. आपण आपल्या महत्वाकांक्षा पूर्ण करू शकाल. मित्रांचा अनुकूल पाठिंबा मिळेल. नोकरीपेशा व्यक्तींना कार्यस्थळावर पाठबळ मिळेल.

**तूळः** व्यापारात आपणास कमी प्राप्ती होईल पण नुकसान मोठे होईल. जर आपणास एका कार्यात वाढ मिळाली तर इतर कार्यात अवनती होणे शक्य आहे. आपल्या आत्मविश्वासाचा स्तर वाढविण्याचा प्रयत्न करा. अधिक श्रम करावे लागतील. व्यापार-व्यवसाय व आर्थिक विषयांमध्ये सावधगिरी बाळगावी लागेल. शत्रू पक्षापासून सावध राहा. धार्मिक भावना वाढेल. सामुदायिक कार्यांमध्ये अनुकूल सहकाऱ्यांबरोबर प्रतिष्ठा वाढेल. राजकारणी लोकांसाठी स्थिती संतोषजनक असेल. आर्थिक लाभ मिळेल.

**वृश्चिक** : कौटुंबिक वातावरण सुखद राहील. आर्थिक प्रयत्नांमध्ये स्थिती अनुकूल राहील. सौंदर्याकडे आकर्षण वाढेल. विद्यार्थ्यांसाठी वेळ उत्तम. वाद-विवाद किंवा प्रतिस्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळेल. विशिष्ट व्यक्तींच्या संपर्कात सहयोग मिळेल. आरोग्य उत्तम राहील. सामुदायिक उपक्रमांमध्ये समक्षता आपणास सुविख्यात बनवेल.

**धनु** : एखाद्या जिवलगा बरोबर भागीदारीसाठी वैयक्तिक पातळीवर संबंध वाढविण्याचा प्रयत्न करा. साधारणपणे इतर लोकांबद्दल आपली भावनात्मक प्रतिक्रिया आवश्यकतेपेक्षा अधिक असते. चांगले भोजन व मौजमजेत दिवस व्यतीत होईल. एखाद्या महत्वाच्या व्यक्तीशी भेट झाल्याने आनंद होईल. मानसिक स्थिती आनंददायक राहील. वैवाहिक जीवनात सुख मिळेल. आनंदाची बातमी मिळेल.

**मकर** : आर्थिक बाबतीत काळ अनुकूल आहे. सामाजिक कार्यांमध्ये सहयोग अनुकूल राहील व मान-सन्मान वाढेल. राजकीय व्यक्तींसाठी स्थिती संतोषजनक राहील. आर्थिक लाभ होईल. मान-सन्मानाच्या क्षेत्रात वाढ होईल. कामात एखाद्याचा सहयोग प्रगतीचे कारण बनेल. आर्थिक विषयांमध्ये थोड्या अडचणी येऊ शकतात.

**कुंभ** : मानसिक स्थिरता वाढेल. मान-सन्मानात वाढ होईल. शत्रू पराभूत होतील. व्यापार-व्यवसायात सुखद स्थितीचे वातावरण राहील. वैवाहिक सुख वाढेल. नोकरपेशा व्यक्तींसाठी काळ चांगला आहे. आरोग्याच्या दृष्टीने काळ अनुकूल आहे. कौटुंबिक विषयांमध्ये सहयोग द्यावा लागू शकतो. आपणास ध्येय मिळविण्यात पूर्ण यश मिळेल. कौटुंबिक विषयांमध्ये वेळ चांगला जाईल. व्यापार-व्यवसायात स्थिती अनुकूल राहील.

**मीनः** उत्तम अन्नाचे सुख मिळेल. मित्र आनंद देतील. महत्वपूर्ण आयोजन होण्याची शक्यता आहे. भेट मिळू शकते. मानसिक सुख-शांतिचे वातावरण राहील. आरोग्य उत्तम राहील. कौटुंबिक वातावरण उत्तम राहील. कौटुंबिक वातावरण उत्तम राहील. स्त्री पक्षाकडून सहयोग मिळेल. मनोरंजनावर खर्च होईल. आरोग्य उत्तम राहील. व्यापार-व्यवसायात प्रगती होईल. एकंदरीतच हा आठवडा तुमच्यासाठी अगदी आनंददायी असेल. ■

# खांदा कॉलनीतील उद्यानात बसणार ई टॉयलेट

## स्थानिक नगरसेवकांच्या मागणीला यश; पनवेल महापालिकेकडून जागेची पाहणी

**पनवेल/प्रतिनिधी**

खांदा वसाहतीतील सेक्टर ६ व ९ येथील उद्यानात रहिवासी येतात. याठिकाणी सायंकाळी मोठ्या प्रमाणात गर्दी होते. दरम्यान येथे शौचालयाची व्यवस्था असावी अशी मागणी स्थानिक नगरसेवकांनी पनवेल मनपाकडे केली होती. या मागणीची दखल घेत प्रशासनाकडून घेण्यात आले आहे . त्यामुळे याठिकाणी येऊन जागेची पाहणी करण्यात आली. लवकरच दोन्ही ठिकाणी ई टॉयलेट बसवण्यात येणार आहेत. त्यामुळे नागरिकांची गैरसोय टळणार आहे.

नवीन पनवेलचा पश्चिम भागात असलेला खांदा कॉलनी चा परिसर गजबजलेला आहे. येथील लोकवस्ती ही दिवसेंदिवस वाढत चालली आहे. सेक्टर ६आणि ९ येथे सिडकोचे उद्यान आहेत. त्यामुळे सहाजिकच सकाळी आणि संध्याकाळी नागरिक वॉक करण्यासाठी या ठिकाणी जातात. ज्येष्ठ नागरिक शतपावली करतात. त्याच बरोबर महिला आपल्या मुलांना खेळण्यासाठी या येथे घेऊन येतात. त्यामुळे उद्यानात कायम गर्दी असते. सुट्टीच्या दिवशी ही उद्याने गजबजून जातात. उन्हाळा आणि दिवाळीच्या सुट्टी सुद्धा गार्डन हाउसफुल असतात रहिवाशांना विरंगुळा आणि क्षणभर विसाव्यासाठी हे दोनच उद्यान आहेत. त्यामुळे येथे पायाभूत सुविधा असाव्यात अशी मागणी स्थानिक नगरसेवक सातत्याने करीत होते. विशेष करून नागरिक येथे मोठ्या प्रमाणे येत



असतानाही सार्वजनिक शौचालयाची याठिकाणी व्यवस्था नाही. परिणामी गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. महिलांची एक प्रकारे कुचंबना होत होती. या पार्श्वभूमीवर या उद्यानात शौचालयाची व्यवस्था करावी अशी मागणी नगरसेवक एकनाथ गायकवाड, प्रभाग समिती सभापती संजय भोपी, ज्येष्ठ नगरसेविक सिताताई सदानंद पाटील, आणि कुसुम गणेश पाटील यांनी केली होती. येथे ई टॉयलेट असावेत असा आग्रह महापालिका आयुक्त सुधाकर देशमुख यांच्याकडे धरला होता. एकनाथ गायकवाड यांनी बाबत पत्रव्यवहार महापालिकेला केला होता. नगरसेविका सिताताई पाटील यांनीसुद्धा सिडकोकडे २०१४ पासून पाठपुरावा केला. त्यानंतर मनपा प्रशासनाकडे ही याबाबत मागणी केली होती. स्वच्छ भारत अभियान त्याचबरोबर स्वच्छता सर्वेक्षण याशिवाय नागरिकांची होणारी गैरसोय या गोष्टी लक्षात घेऊन नगरसेवकांच्या मागणीला आयुक्तांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. त्यानुसार खांदा वसाहतीतील उद्यानांमध्ये ई टॉयलेट बसवण्यात येणार आहेत. यासाठी जागेची पाहणी सुद्धा प्रशासनाकडून करण्यात आली. याप्रसंगी संबंधित नगरसेवक उपस्थित होते. त्यांनी अधिकाऱ्यांना काही सूचना दिल्या. कनिष्ट अभियंते अनिल कोकरे, चिन्मय सापने, सुमेध गायकवाड, आदेश गायकवाड व मनोज टाक यांनी प्राथमिक पातळीवर सर्वेक्षण केले.

### दोन अपघात, तीन जखमी

**पनवेल/प्रतिनिधी**

पनवेल परिसरात झालेल्या दोन वेगवेगळ्या अपघातात तीन जण जखमी झाल्याची घटना घडली आहे.

शहरातील श्री छत्रपती शिवाजी महाराज पोलिस चौकीसमोर पायी जात असलेले निवृत्त तहसिलदार बाळकृष्ण खेडेकर (वय-७५) यांना पांढऱ्या रंगाच्या गाडीने धडक दिल्याने ते मोठ्या प्रमाणात जखमी झाले आहेत. या घटनेनंतर गाडीचालक गाडी घेऊन पसार झाला आहे. तर दुसऱ्या घटनेत करंजाडे येथे कृष्णकुमार राय हे त्यांचा मित्र राजकुमार राय यांच्यासोबत मोटारसायकलीवरून से.-आर३ येथे जात होते. त्याचवेळी एका गाडीने त्यांच्या मोटारसायकलीस धडक दिल्याने झालेल्या अपघातात ते दोघे जखमी झाले आहेत. यात दोन्ही वाहनांचे नुकसान झाले आहे.

### दोन वाहनांची चोरी

**पनवेल/प्रतिनिधी**

पनवेल परिसरातून दोन दुचाकी वाहनांची चोरी झाल्याची घटना घडली आहे. त्यामुळे वाहनचालकांमध्ये भीतीयुक्त वातावरण आहे.

शहरातील अमरधाम स्मशानभूमीच्या गेटसमोर प्रल्हाद पाटील यांनी त्यांची काळ्या रंगाची बजाज कंपनीची डिस्कव्हर १०० सीसी गाडी क्र-एमएच ४३ एएच ०२७१ ही उभी ठेवली असता अज्ञात चोरट्यांनी सदर गाडी चोरून नेली आहे. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. तर दुसऱ्या घटनेत कळंबोली वसाहतीतील के.एल. ४ बिल्डींग नं.-९ आकाशगंगा समोरून अक्टीव्हा गाडी क्र.-एमएच ४६ एबी ३३०६ ही अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली आहे. याबाबतची तक्रार कळंबोली पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

### तरूणी घरी परतलीच नाही

**पनवेल/प्रतिनिधी**

शहरातील उरण नाका येथे कामावर जाते असे सांगून कामावर गेलेली तरूणी अद्याप घरी न परतल्याने ती हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

आरती खंडू लहाने (वय-१९) असे या तरूणीचे नाव असून रंग सावळा, चेहरा गोल, डोळे काळे, केस काळे लांब, उंची अंदाजे ४ फूट ५ इंच अंगात निळ्या रंगाचा कुर्ता, पांढऱ्या रंगाची ओढणी व लेगिन्स, डाव्या हातात दोन चांदीच्या अंगठ्या, गळ्यात साधी चैन, पायात चप्पल आहे. तीला मराठी, हिंदी, इंग्रजी भाषा अवगत आहे. सोबत कॉलेजची निळ्या रंगाची सॅक व मोबाईल फोन आहे. या तरूणीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलिस ठाणे दुरध्वनी-२७४५२३३३ किंवा पोलिस नाईक यु.बी. पाटील यांच्याशी संपर्क साधावा.

# माझे कुटुंब माझी जबाबदारी मोहिमेत साडेसहा लाख पनवेलकर नागरिकांची तपासणी

**पनवेल/प्रतिनिधी**

कोरोनाच्या वाढत्या प्रभावानंतर कोरोनाला हरविण्यासाठी राज्य सरकारने माझे कुटुंब माझी जबाबदारी मोहीम राबविण्यास सुरुवात केली. १५ सप्टेंबरपासून सुरु करण्यात आलेल्या या मोहिमेत ०५ ऑक्टोबरपर्यंत अवघ्या २० दिवसात तब्बल १ लाख ७७ हजार ९३५ कुटुंबातील एकूण ६ लाख ६५ हजार ९१९ नागरिकांची तपासणी करण्यात आली.

यामध्ये पालिका हद्दीतील ३९३ नागरिकांना कोरोनाची लक्षणे आढळून आल्यामुळे त्यातील २७७ जणांची तपासणी केली असता १०६ रुग्ण हे कोरोनाबाधित आढळून आले. तर पनवेल तालुक्यातील घरोघरी जाऊन करण्यात आलेल्या तपासणीमध्ये ९८.७ पेक्षा जास्त कोमोरबीड असलेल्या नागरिकांमध्ये ९ जण, एसओपी २.९५ पेक्षा कमी असलेल्या नागरिकांमध्ये ९२ जण, कोमोरबीड (दुर्धर आजार) असलेल्या व्यक्तींमध्ये १४७९ जण तर आयएलआर / सारी या आजाराची लक्षणे असलेल्या ११३ नागरिकांचे अहवाल सादर करण्यात आले आहेत. यामध्ये तालुक्यातील संशयित आढळलेल्या ८८ रुग्णांना जवळील प्राथमिक केंद्रामध्ये पाठविण्यात आले. पनवेल तालुक्यामध्ये पंचायत समितीच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या माझे कुटुंब माझी जबाबदारी मोहिमेत आतापर्यंत आजिवली प्राथमिक आरोग्य केंद्रात १६१२२ कुटुंबातील ५३५४७ नागरिकांची तपासणी करण्यात आली तसेच गव्हाण प्राथमिक आरोग्य केंद्रात ८३१९ कुटुंबातील ३११४९ नागरिक, आपटा प्राथमिक आरोग्य केंद्रातील १०८३८ कुटुंबातील ४०४८६ नागरिक, वावंजे प्राथमिक आरोग्य केंद्रातील ३९६७ कुटुंबातील १३०६२ आणि नेरे प्राथमिक आरोग्य केंद्रातील १४५३६ कुटुंबातील ५६८१९ नागरिकांची तपासणी करण्यात आली. तालुक्यातील संशयित आढळलेल्या ८८ रुग्णांना जवळील प्राथमिक केंद्रामध्ये पाठविण्यात आले. ज्या पद्धतीने प्रशासन या मोहिमेत सहभाग घेऊन आपली कार्यतत्परता दाखवीत आहे त्यानुसार कोरोनासारख्या महाभयंकर आजाराला दूर करण्यासाठी लवकरच प्रशासनाला यश मिळेल, अशी शक्यता आता निर्माण झाली आहे.



# वाहतूक कोंडीप्रश्नी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्याकडून पाहणी

**पनवेल/प्रतिनिधी**

नवीन पनवेल ते नेरे या मार्गावर होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे येथे मोठ्या प्रमाणात ताण पडत आहे तसेच भविष्यात नैना प्रकल्पामुळे विकास होणार असून, नागरिकरण वाढणार आहे. ते लक्षात घेत भाजपच्या वतीने सुकापूर येथे एक्स्प्रेस वेच्या माध्यमातून एण्ट्री आणि एक्झिट पॉइंट उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी करण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर सोमवारी (दि. ५) पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी एमएसआरडीसीचे कार्यकारी अभियंता जगताप आणि महापालिकेचे अभियंता कटेकर यांच्यासोबत सुकापूर येथे जाऊन पाहणी करून चर्चा केली.

नवीन पनवेल ते नेरे या परिसराचा नैना प्रकल्पातंर्गत विकास होत आहे. त्यामुळे येत्या काळात येथे मोठ्या प्रमाणात नागरिकरण होणार असून, या ठिकाणांवरील रस्त्यांवर ताण पडणार आहे. तसेच एचडीएफसी सर्कल ते आदई सर्कल आणि कळंबोली सर्कल या ठिकाणी होणारी वाहनांची कोंडी लक्षात घेता भविष्यात वाहतूक कोंडीची समस्या उद्भवू नये यासाठी आणि या परिसरात ये-जा करणाऱ्या वाहनचालकांच्या वेळ व इंधनाची बचत व्हावी याकरिता भाजपच्या वतीने सुकापूर येथे मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेच्या माध्यमातून वाहतुकीसाठी एण्ट्री आणि एक्झिट पॉइंट उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी करण्यात आली होती.

पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी एमएसआरडीसीचे कार्यकारी अभियंता जगताप व महापालिकेचे अभियंता कटेकर यांच्यासोबत त्या ठिकाणाची पाहणी करून चर्चा केली. या पाहणी दौऱ्यात नगरसेवक संतोष शेट्टी, समीर ठाकूर, जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव तसेच राजेश पाटील उपस्थित होते. या वेळी परेश ठाकूर यांनी लवकरात लवकर यातून मार्ग निघावा आणि नागरिकांना दिलासा मिळावा यासाठी प्रयत्नशील असल्याचे सांगितले.

## विजय कडू यांचा वाढदिवस साजरा

**पान १ वरुन**

करून विखुरलेल्या पनवेल परिसरातील पत्रकाराने एकत्र बांधण्याचे काम त्यांनी केले असून आपल्या आदरणीय अप्पाचा आज वाढदिवसा आल्याचे समजता सर्व पत्रकार ताबडतोब वाटल्वार या त्यांच्या कार्यालयात धाऊन येऊन त्यांना शुभेच्छा चा वर्षाव केला या वाढदिवसाच्या कार्यक्रमासाठी पनवेल प्रेस क्लब चे अध्यक्ष व कोकण डायरी संपादक श्री.अकबर सय्यद, क्षितिज पर्वचे संपादक - श्री सनिप कलोते ,स्टार पनवेल संपादक अनिल राय, पत्रकार संजय कदम, पत्रकार दिपक महाडिक, रायगड टुडे संपादक क्षितिज कडू, आदिवासी सम्राट चे संपादक गणपत वारगडा, पत्रकार राज भंडारी, पत्रकार शंकर वायदंडे, रायगड मत संपादक जितेंद्र नटे, पत्रकार संतोष वाव्हळ, पत्रकार साहिल रेळेकर, पत्रकार संतोष सुतार आदी पत्रकार उपस्थित राहून कडूसाहेबांन वरती शुभेच्छा दिल्या.

### मोबाईल खेचून पसार

**पनवेल/प्रतिनिधी**

कळंबोली वसाहतीतील सेक्टर ९ येथील नेहा जैसवाल या औषध घेण्याकरिता डी मार्ट समोरील वेलनेस मेडीकल येथे गेल्या होत्या. औषध घेवून त्या फोनवर बोलत असताना मोटार सायकलीवरुन आलेल्या दोन अनोळखी इसमापैकी एका इसमाने त्यांच्या हातातील फोन जबरदस्तीने खेचून घेवून ते पसार झाले आहेत.

याबाबतची तक्रार कळंबोली पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

# दोघा सराईत गुन्हेगारांना अटक

**पनवेल/प्रतिनिधी**

पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीतील शिरढोणपाडा या गावातील राहणाऱ्या भारती भरत चौधरी यांच्या बंद घराच्या दरवाजाचा कडी कोयंडा उचकटुन ५,६२,००० रुपये किमतीचे १४० ५०० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिन्याची घरफोडी चोरी करणाऱ्या दोघा सराईत गुन्हेगारांना पनवेल शहर पोलीसांनी गजाआड केले आहे.

सदरचा गंभीर स्वरुपाचा गुन्हा उघडकीस आणण्यासाठी पोलीस आयुक्त बिपीनकुमार सिंग, पोलीस सहआयुक्त डॉ. जय जाध, पोलीस उप आयुक्त शिवराज पाटील व सहा पोलीस आयुक्त रविंद्र गिड्डे यांनी विशेष प्रयत्न करण्याबाबत सुचना दिल्या होत्या.

वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांच्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक शत्रुघ्न माळी यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस अधिकारी पोउपनि सुनिल तारमळे व कर्मचारी पोहवा विजय आयरे, पोशि विवेक पारासुर, पोशि सुनिल गर्दनमारे व पोशि यादवराव घुले यांचे विशेष पथक नेमले होते. सदर घरफोडीचे कार्यपध्दतीचा



बारकाईने अभ्यास करता असे लक्षात आले की , सदर घरफोडी चोरीचे आरोपीत हे याच परीसरातील असावेत त्या अनुशंगाने तपास सुरू केला. सदर पथकाने गुप्त बातमीदार मार्फत खात्रीशीर माहिती प्राप्त करून सदरच्या भागात आरोपीतवर पाळत ठेवुन एका आरोपीस पळस्पे फाटा, पनवेल येथुन ताब्यात घेवुन त्याच्याकडे गुन्ह्याबाबत कौशल्यपुर्ण तपास केला असता त्याने त्याचे नाव अनिल लक्ष्मण नाईक, वय ३५ वर्ष रा.गिरवले गाव, ता. पनवेल, जि.रायगड असे सांगुन त्याने सदरचा गुन्हा त्याचा साथीदार राजेश नारायण वाजेकर, वय ३८ वर्ष , रा. शिरढोणपाडा, ता.पनवेल, जि.रायगड याचे मदतीने केला असल्याचे सांगितले. आरोपी नामे राजेश नारायण वाजेकर यास शिरढोणपाडा येथुन शिताफीने ताब्यात घेवुन दोन्ही आरोपीत यांना अटक केली आहे. सदर आरोपीतांकडुन गुन्ह्यातील ५,१४,००० रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने हस्तगत केले आहेत. सदर गुन्ह्याचा तपास पोउपनि सुनिल तारमळे हे करीत आहेत. सदरची कारवाई पनवेल शहर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि निलेश राजपुत, पोलीस उप निरीक्षक सुनिल तारमळे, पोहवा विजय आयरे, पोशि विवेक पारासुर, पोशि सुनिल गर्दनमारे, पोशि यादवराव घुले, पोना अमरदिप वाघमारे, पोहवा नितीन वाघमारे, पोना नंदकुमार माने, पोना पंकज पवार पोना गणेश चौधरी, पोशि म्हाळु आल्हाड व पोशि राजु खेडकर या पथकाने केली आहे.

# तळोजा औद्योगिक वसाहतीतील विविध समस्यांसंदर्भात टीआयएने घेतली सिडको व्यवस्थापकीय संचालक व उपाध्यक्ष यांची भेट

**पनवेल/प्रतिनिधी**

तळोजा औद्योगिक वसाहतीतील विविध समस्यांसंदर्भात टीआयएच्या पदाधिकाऱ्यांनी सिडको व्यवस्थापकीय संचालक व उपाध्यक्ष डॉ.संजय मुखर्जी यांची भेट घेतली व त्यांच्यासमोर समस्या मांडल्या.

सहव्यवस्थापकीय संचालक कैलाश शिंदे, तळोजा इंडस्ट्रीज असोसिएशनच्या (टीआयए) व्यवस्थापकीय समितीच्या सदस्यांनी डॉ संजय मुखर्जी (आयएएस) यांची भेट घेतली. यावेळी तळोजा एमआयडीसी क्षेत्रात योग्य मार्गाने संपर्क साधण्याचे मार्ग नसल्याचे सतीश शेट्टी (अण्णा) यांनी सांगितले. त्यामुळे, तळोजा एमआयडीसीमध्ये मेट्रो स्थानके उभारण्याच्या स्थितीविषयी चर्चा झाली. टीआयएने यावर भर दिला की दोन मेट्रो स्थानके (स्टेशन क्रमांक १२ आणि १३) उभारणे उद्योग व त्यांचे कर्मचारी यांच्यासाठी एक वरदान ठरेल. याशिवाय तळोजा परिसरातील रहिवासीही या सुविधेचा लाभ घेऊ शकतात. सतीश शेट्टी (अण्णा) म्हणाले की मेट्रो मेट्रोने तळोजा एमआयडीसी क्षेत्राशी जोडलेले नसल्यास १ ते ११ या काळात मेट्रो स्थानकांना सिडकोसाठी व्यावसायिक व्यवहार्यता मिळणार नाही. कारण तळोजा एमआयडीसीमध्ये ३ लाख कर्मचारी काम करतात. डॉ. मुखर्जी यांनी ही समस्या समजून घेतली. तळोजा सीईटीपीपासून रोडपालीला जोडणाऱ्या उड्डाणपुलापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण पूर्ण करण्याच्या स्थितीवर चर्चा झाली. तळोजा एमआयडीसी क्षेत्रातील हा दुसरा प्रवेश रस्ता आहे. अर्धा रस्ता पूर्ण झाला आहे. सतीश शेट्टी (अण्णा) यांनी सिडको व त्याचे कंत्राटदार (पी.पी.खारपाटील) यांचे आभार मानले. यावेळी डॉ. मुखर्जी यांनी आश्वासन दिले की मे २०२१ पर्यंत हा प्रकल्प पूर्ण करण्याचा प्रयत्न करू.

नवीन उड्डाणपूल आवश्यक- टीआयएने सिडकोला जुन्या मुंबई पुणे महामार्गावरुन तळोजा एमआयडीसीकडे जाणाऱ्या रोडपाली (कळंबोली) येथून उड्डाण करणारे उड्डाणपूल बांधण्याचा विचार करण्याची विनंती केली. डॉ. मुखर्जी यांनी यावर सहमती दर्शविली आणि सांगितले की, उड्डाणपूल बांधण्याचे काम सिडको करीत आहे. टीआयएने सिडकोने केलेल्या नियोजनाचे कौतुक केले. ट्रक टर्मिनस- टीआयएने ट्रक टर्मिनसच्या बांधकामासाठी भूखंड देण्याचा विचार करण्याची विनंती सिडकोला केली. या हालचालींमुळे परिसरातील ट्रक वाहतुकीचे प्रमाण कमी होईल. सतीश शेट्टी (अण्णा) म्हणाले की, सिडकोचे भूखंड उपलब्ध आहेत, जे ट्रक टर्मिनस तयार करण्यासाठी राखीव ठेवता येतील. डॉ. मुखर्जी यांनी सिडकोने भूखंड दिल्यास ट्रक टर्मिनस कोण चालवणार याबाबत विचारणा केली. सतीश शेट्टी (अण्णा) यांनी अशी टीका केली की टीआयए स्वत:हून हे करू शकते किंवा प्रकल्पासाठी ऑपरेटरची व्यवस्था करू शकते.

ईएसआयसी हॉस्पिटल-तळोजा एमआयडीसी ३ लाखांहून अधिक लोकांना रोजगार देते आणि यातील बहुतेक लोक ईएसआयसी सेवा मिळवण्याच्या श्रेणीत येतात. म्हणून टीआयएने डॉ. मुखर्जी यांना समजावून सांगितले की पनवेल भागात ईएसआयसी हॉस्पिटलची उपस्थिती सर्वांसाठी एक वरदान ठरेल. डॉ. मुखर्जी म्हणाले की, ईएसआयसी प्रकल्प राबविण्यास तयार असेल तर सिडको अशा हॉस्पिटल प्रकल्पाला पाठिंबा देण्यास उत्सुक असेल. सिडकोने टीआयएला हा उपक्रम सुरू करण्यास, समन्वय साधून संयुक्त बैठकीची व्यवस्था करण्याचा सल्ला दिला.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून दिवंगत पत्रकार संतोष पवार यांच्या कुटूंबाला पाच लाखाची मदत सुपूर्द

**पनवेल/प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील माथेरान येथील ज्येष्ठ पत्रकार संतोष पवार यांचे ९ सप्टेंबर रोजी निधन झाल्यानंतर माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी संतोष पवार यांच्या कुटुंबाला पाच लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली होती. या मदतीचा धनादेश भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी सोमवारी (दि. ५) नेरळ येथे येऊन पवार कुटुंबीयांकडे सुपूर्द केला.



महाविकास आघाडी सरकार दिवंगत पत्रकार संतोष पवार यांच्या कुटुंबियांना कधी मदत करेल..? हे सांगता येणार नाही, पण लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दिलेला शब्द पूर्ण केला आहे. त्यामुळे समस्त रायगडमधील पत्रकारांकडून या शब्दपूर्तीबद्दल आभार व्यक्त केले गेले. पवार कुटुंबियांना न्याय मिळण्याच्या दृष्टीने मृत्यूची सखोल चौकशी व्हावी तसेच त्यांच्या परिवाराला शासनाकडून जास्तीत जास्त आर्थिक सहकार्य मिळावे, अशी आग्रही मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे तसेच सार्वजनिक आरोग्यमंत्री राजेश टोपे यांच्याकडे यापूर्वीच केली आहे.

संतोष पवार हे कोविड काळातदेखील काम करीत होते. त्यामुळे त्यांचा झालेला मृत्यू लक्षात घेऊन त्यांना राज्य शासनाने कोरोना योद्धा म्हणून जाहीर करावे आणि विमा कवचचा लाभ द्यावा, अशी मागणी या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली तसेच यासाठी पाठपुरावा करणार असल्याचे सांगितले.

संतोष पवार यांच्या नेरळ येथील घरी सोमवारी आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह मुंबई मराठी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष तथा दैनिक रामप्रहरचे मुख्य संपादक देवदास मटाले, मुंबई मराठी पत्रकार संघाचे माजी कोषाध्यक्ष व ज्येष्ठ पत्रकार दीपक म्हात्रे, भाजपचे कर्जत तालुका सरचिटणीस राजेश भगत आदी उपस्थित होते. या वेळी दिवंगत संतोष पवार यांच्या पत्नी मनीषा, पुत्र मल्हार, मुलगी मृण्मयी आणि सासरे यांचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांत्वन केले तसेच संतोष पवार यांच्या अनेक आठवणींना उजाळाही दिला. जवळचे स्नेही आणि राजकीय वातावरणात निर्माण होणाऱ्या नवनवीन बदलांबद्दल नेहमी आपुलकीने बोलणारे व्यक्तिमत्व आपल्यातून गेल्याचे दुःख आहे, असे ते म्हणाले. मल्हार पवार याने कोणतीही मदत लागल्यास हक्काने आपल्याला हाक मारावी, असे आवाहनही त्यांनी केले.

# नवी मुंबईतील ६२ वर्षीय महिलेने ४ रुग्णांना दिले जीवनदान

**नवी मुंबई/प्रतिनिधी**

पनवेल येथील एका ६२ वर्षे वयाच्या महिलेला गंभीर अवस्थेत नवी मुंबईतील अपोलो हॉस्पिटलमध्ये २६ सप्टेंबर रोजी दाखल करण्यात आले. तिची तपासणी केल्यावर तिला इंट्रा क्रॅनियल हेमोरॅज' असल्याचे निदान झाले. सर्व प्रकारच्या उपचारपद्धती व प्रयत्न करूनही ती बरी होऊ शकली नाही आणि क्लिनिकल प्रोटोकॉलनुसार, २९ सप्टेंबर रोजी तिला ब्रेनडेड घोषित करण्यात आले. उपचार करणाऱ्या डॉक्टरांनी तिच्या कुटुंबियांना अवयवदानाबद्दल माहिती दिली. त्या कुटुंबाने मोठ्या औदार्याने त्या महिलेच्या अवयवांचे दान करण्यास सहमती दर्शविली. या कामी झेडटीसीसी' चे सहकार्य घेण्याचे ठरविण्यात आले.

मृत देणगीदाराकडून यकृत, मूत्रपिंडे आणि फुफ्फुस हे अवयव घेण्यात आले. कोल्हापूर येथील एका ३९ वर्षांच्या व्यक्तीवर यातील यकृताचे प्रत्यारोपण करण्यात आले. त्याला शेवटच्या टप्प्यातील यकृताचा आजार होता. मूत्रपिंडांचे प्रत्यारोपण नवी मुंबईतील अपोलो हॉस्पिटल नवी मुंबई येथे करण्यात आले.

मृत महिलेच्या फुफ्फुसांसाठी महाराष्ट्रात योग्य प्राप्तकर्ता आढळला नाही. त्यामुळे त्याबाबत झेडटीसीसी' ची मदत घेण्यात आली. त्या माध्यमातून चेन्नईमध्ये एक योग्य प्राप्तकर्ता सापडला. फुफ्फुस चेन्नईला पाठविण्याकरीता बेलापूरच्या अपोलो हॉस्पिटलपासून मुंबई विमानतळापर्यंत ग्रीन कॉरिडोर'चे नियोजन करण्यात आले. ३० किलोमीटर्सचे अंतर ३८ मिनिटांत पार पाडून ते फुफ्फुस विमानाने चेन्नईला पाठवण्यात आले. चेन्नईच्या अपोलो हॉस्पिटलमध्ये तेथील रुग्णावर प्रत्यारोपित करण्यात आले. त्या एका दिवसात चेन्नईच्या अपोलो हॉस्पिटलमध्ये झालेली फुफ्फुस प्रत्यारोपणाची ही दुसरी शस्त्रक्रिया होती. नवी मुंबई आणि सूरत येथून पाठवण्यात आलेल्या दोन फुफ्फुसांमुळे चेन्नईतील २ वेगवेगळ्या रूग्णांना जीवनदान मिळाले. नवी मुंबईतील अपोलो हॉस्पिटल्सचे वैद्यकीय सेवा संचालक डॉ. अतुल अदानिया म्हणाले, अवयवदानाचे मोठे औदार्य दाखविल्याबद्दल आम्ही त्या महिलेच्या कुटुंबाचे आणि झेडटीसीसीचे मनापासून आभार मानतो. त्यांच्यामुळे अवयवांची प्रतीक्षा करणाऱ्या रूग्णांना प्रत्यक्ष जीवनाचे दान मिळाले. आमच्या हॉस्पिटलमधील दात्याकडून मिळालेले एक यकृत आणि दोन मूत्रपिंडे या तीन अवयवांचे प्रत्यारोपण आम्ही एकाच दिवसात केले. संबंधित महिलेच्या कुटुंबाने आपली प्रिय व्यक्ती गमावली, मात्र तिने इतर चार जणांना नवे आयुष्य दिले.

# मोटार सायकल विकत देण्याच्या बहाण्याने ऑनलाईन फसवणूक

**पनवेल/प्रतिनिधी**


मोटार सायकल विकत देतो असे सांगून त्याद्वारे ७५ हजार रुपयाची ऑनलाईन फसवणूक केल्याचा प्रकार पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडला आहे.

उसर्ली खुर्द येथील सलीम दुराणी अबासी यांना सेकंड हॅण्ड बुलेट गाडी खरेदी करायची होती. त्यांना ओएलएक्स ऑनलाईन साईटवर बुलेट मोटार सायकल दिसून आली त्यानंतर त्यांनी समोरच्या व्यक्तीला फोन केला असता त्यांनी त्याचे विश्वनाथ तुपके असे सांगून तो सीआयएसएसमध्ये नोकरीस असल्याचे सांगितले. त्यांच्यात ७५ हजार रुपयाचा व्यवहार ठरला. अबासी यांनी ७५ हजार रुपये त्यांच्या अकाऊंटवर जमा केले. यावेळी तुमची गाडी अहमदाबादवरुन निघाली असून ती तुम्हाला लवकरच मिळेल असे सांगितले. मात्र त्यानंतर अबासी यांच्याकडून बुलेट गाडी मिळाली नाही त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात येताच त्यांनी संबंधित व्यक्तीविरुद्ध पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

# केंद्राच्या कृषी विधेयकाची महाराष्ट्र राज्यात अंमलबजावणी करा: भाजप

**पनवेल/प्रतिनिधी**

केंद्राच्या कृषी विधेयकाची महाराष्ट्र राज्यात अंमलबजावणी करण्यात यावी, अशी मागणी पनवेल भाजपच्या वतीने करण्यात आली असून दलालांच्या फायद्यासाठी कृषी विधेयकाच्या अंबलबजावणीस स्थगिती देणाऱ्या महाविकास आघाडी सरकारच्या कृतीचा निषेधही व्यक्त करण्यात आला.



या संदर्भात भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेलचे तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. तहसीलदारांच्या वतीने निवासी नायब तहसीलदार संजय मांडे यांनी हे निवेदन स्विकारले. यावेळी निवेदन देताना युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष आनंद ढवळे, भाजप कार्यालयीन सचिव रमेश देशमुख आदी उपस्थित होते. केंद्र सरकारने लोकसभा व राज्यसभेत मंजूर केलेले विधेयक हे शेतकर्यांच्या हिताचे असून यामुळे शेतकर्यांना शेतमाल विक्रीची आणि किंमतीची हमी मिळणार आहे. कृषी प्रक्रिया प्रकल्पातील गुंतवणूकीत वाढ होणार असल्याने संपूर्ण देशभरातील बळीराजांकडून पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय कृषी मंत्री नरेंद्रसिंग तोमर व सर्व मंत्री मंडळ यांच्या निर्णयाचे जल्लोषात स्वागत होत असून या तिन्ही विधेयक शेतकर्यांसाठी वरदान ठरणार असल्याने शेतकर्यांमध्ये प्रचंड आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. हे शेतकरी कल्याणकारी विधेयक असतानाही विरोधक मात्र त्या संदर्भात गैरसमज पसरवून शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण करीत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या विकासासाठी असलेला विधेयक राज्यात लागू करण्यासाठी ताबडतोब अंमलबजावणी होण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

तहसीलदार यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हंटले आहे कि, देशांतील शेतकरी दलालांच्या जोखडातून मुक्त होण्यासाठी त्यांना शेतीमालाची विक्री कुठेही आणि योग्य भावात विकण्याचे स्वातंत्र्य मिळण्यासाठी केंद्र शासनाने कृषी विधेयक मंजूर केले व त्याची अंमलबजावणी संपूर्ण देशात सुरू केली, परंतू महाराष्ट्र शासनाने शेतकऱ्यांचे हित लक्षात न घेता केवळ दलालांचा फायदा होण्यासाठी सदर कृषी विधेयकाच्या अंमलबजावणीस स्थगिती दिलेली आहे. महाराष्ट्र शासनाच्या या कृतीचा आंम्ही निषेध व्यक्त करीत असून महाराष्ट्र राज्यातील शेतकऱ्यांचे हित, शेतकऱ्यांचा फायदा व शेतकऱ्यांचा शेतमाल विकण्याचे स्वातंत्र्य अबाधित राहण्यासाठी स्थगिती उठवून कृषी विधेयकाची अंमलबजावणी राज्यात लवकरात लवकर करण्यात यावे, असे या निवेदनात स्पष्ट केले आहे.

# सिडकोचे सातशेहून अधिक सफाई कामगार असुरक्षित

**पनवेल/प्रतिनिधी**

सिडको अखत्यारित उलवे, करंजाडे आणि द्रोणागिरी या नोडमध्ये काम करणारे स्वच्छता विषयक कर्मचारी काम करतात. ते सिडकोचे कामगार आहेत. त्याचबरोबर पनवेल आणि नवी मुंबई परिसरातील सर्व रेल्वे स्थानक सिडको मुख्यालय आणि इतर क्षेत्रीय कार्यालयात सफाई कामगार काम करतात. धूर फवारणी सह ७०० पेक्षा जास्त कामगार सिडकोकडे आहेत. त्यांच्या प्रलंबित मागण्यांकडे प्राधिकरणाने सातत्याने दुर्लक्ष केले आहे. यासाठी आझाद कामगार संघटनेने कायम आवाज उठवला. कोरोना वैश्विक संकटात डॉक्टर, परिचारिका, पोलीस यांच्याबरोबरच सफाई कामगार सुद्धा कोविड यौध्दे म्हणून गणले जातात. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अखत्यारीत असलेल्या कामगारांना विमा सुरक्षा कवच दिला जात आहे. त्यांना सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून साधने पुरवली जात आहेत. परंतु सिडकोकडे काम करणाऱ्या स्वच्छताविषयक कामगारांकडे सातत्याने दुर्लक्ष करण्यात आले आहे. राज्यातील सर्वात श्रीमंत महामंडळ असलेल्या सिडकोच्या सफाई कामगारांची सुरक्षितता रामभरोसे असल्याचे स्पष्ट झाले आहे. आझाद कामगार संघटनेचे अध्यक्ष महादेव वाघमारे यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी कामगारांनी आपल्या न्याय मागण्यांसाठी सिडको भवन च्या गेट समोर ठिय्या आंदोलन करत प्रशासनाचे लक्ष वेधले. सामाजिक अंतर राखून कामगारांनी सिडकोच्या धोरणाचा निषेध नोंदवला. फलकाद्वारे आपल्या मागण्या सिडको समोर मांडल्या. सिडकोचे मुख्य आरोग्य अधिकारी डॉ. बी. एस बावस्कर, सिडको रेल्वे प्रकल्पाचे अधीक्षक अभियंता सुधाकर विसाळे, मुख्यालयाचे अधीक्षक अभियंता फुलारे यांनी कामगारांच्या वतीने महादेव वाघमारे यांना चर्चेस बोलवले, कामगारांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून सर्व मागण्यांबाबत सिडको सकारात्मक असल्याचे त्यांनी सांगितले.







Owner, Printer and Publisher Sulochana Santosh Bhagat Printed at Parth Printing Press, Karnala Bhavan, Plot No. 456, A/1, Sahkari Bhat Girni Compound, Market Yard, Panvel 410 206. Published at At-Post Adai, Tal: Panvel- 410 206. Dist- Raigad (Maharashtra). Mob. No. 9167014781 Email : stbhagat781@gmail.com
Editor: Santosh Tukaram Bhagat
MAHMAR/2014/59654